**प्रतिवादी क्र. १अ ते १ड, २अ१ ते २अ३ व प्रतिवादी क्र. २ब व २क तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.निंबाळकर यांचेमार्फत साक्षीदाराचा जादा सरतपास शपथेवर सुरु–**

मी याकामी दि.०१/०७/२००२ रोजीच्या नोटीसची छायांकित प्रत हजर केलेली आहे. सदर मूळ नोटीस गहाळ झालेली असलेमुळे मी छायांकित प्रत हजर केलेली आहे. मी वादीतर्फे विधिज्ञ यांना मूळ नोटीस हजर करणेबाबत नोटीस पाठविलेली होती. तथापि, वादीचे वतीने सदर मूळ नोटीस न्यायालयात हजर करणेत आलेली नाही. मी याकामी केलेली छयाांकित प्रत मला दाखविलेस मी ओळखू शकतो. (साक्षीदारास निशाणी १५०/१ लगत दाखल असणारी नोटीस छायांकित प्रत दाखविणेत आली.) आता मला दाखविणेत आलेली छायांकित प्रत ही तीच आहे. सदर नोटीशीस केवळ ओळखीकरिता **निशाणी क्र. १६८** देणेत आले.

सरतपास पूर्ण.

**वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर.डी.आंबिये यांचेमार्फत साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु–**

मी निशाणी १६८ लगत दाखल असणारी नोटीसीची छायांकित प्रत मी काढून ठेवलेली होती. ती प्रत केव्हा काढणेत आलेली होती त्याची तारीख मला सांगता येणार नाही. सदर प्रत कोणत्या झेरॉक्स सेंटरमधून काढलेली होती ते मला आठवत नाही. सदर मूळ नोटीसीवरुन छायांकित प्रत झेरॉक्स मशीनद्वारे काढतेवेळेस मूळ नोटीसीवर कोठेही कागद ठेवलेला नव्हता. निशाणी १६८ लगत दाखल असणाऱ्या साक्षांकित प्रतीची मूळ नोटीस वैयक्तकरित्या मला आलेली नव्हती अगर कसे हे मला सांगता येणार नाही. सदर मूळ नोटीस आधारे छायांकित प्रत तयार करतेवेळेस माझे वय किती होते हे मला निश्चित सांगता येणार नाही. निशाणी १६८ लगत दाखल असणारी छायांकित प्रत ही माझे वडील मयत झालेनंतर मूळ नोटीशी आधारे तयार केलेली आहे. निशाणी १६८ लगत दाखल असणाऱ्या छायांकित प्रतीची मूळ नोटीस ही वादी पक्षाच्या कब्जात आहे असे माझे म्हणणे आहे. मला दावा इमल्याचा सिटी सर्वे नंबर सांगता

येणार नाही. दि. १३/०६/१९८८ रोजी उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी माझी आजी कमलाबाई हिस दावा इमल्याचा बिगर शेती परवाना वापर बंद करणेबाबत आदेश केलेला होता अगर कसे हे मला माहित नाही. दावा इमल्याचा बिनशेती वापर करणेबाबत माझेकडे परवाना आहे अगर कसे हे मला माहित नाही. मी दावा इमल्याचा वापर करत आहे परंतु, तो बिनशेती आहे अगर कसा हे मला सांगता येणार नाही. मी दावा इमल्यामध्ये शेती करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा इमला हा मी सध्या म्युझिक कॉर्नर वापरासाठी दिलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
(दुर्गा प्र.पुजारी)

दि.११/०३/२०२४. दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),सावंतवाडी.

वरील जबाब साक्षीदारास वाचुन दाखविला असता तो मान्य असल्याचे कबुल करतो.

सही/-

दि.११/०३/२०२४. दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),सावंतवाडी.